संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाची वेबसाईट तयार करण्याकरिता रु.११,९०,०७६/- इतकी रक्कम संक्षित देयकाद्वारे काढण्यास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः- डीपीपी-०२१६/प्र.क्र.५९/पोल-१०,
दुसरा मंजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २१ मार्च, २०१८

वाचा :-

संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.संगणक/ ८०-अ/३३२/२०१६, दिनांक ०४.०२.२०१६

शासन निर्णय :-

संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाची वेबसाईट तयार करण्याकरिता कार्यालयीन खर्च या उद्दीष्टाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात रुपये ११,९०,०७६/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा लाख नव्वद हजार शहात्तर फक्त) इतकी रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास खालील अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे. :-

१. शासन परिपत्रक क्र.मुंविनि-२०१७/प्र.क्र.३८/१७/विनियम, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ मधील सुचनेनुसार "(२०१४ ००२९) १३ - कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखालील दिनांक ३०.०९.२०१७ यापूर्वीची तपशीलवार देयके प्रलंबित नाहीत.

२. दिनांक ३०.०९.२०१७ नंतरच्या तपशीलवार देयकांचा त्वरेने निपटारा करण्यात येईल.

३. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

४. खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

५. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची जबाबदारी सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची राहिल.

६. मासिक निधी विवरणपत्रानुसार याकरिता निधी उपलब्ध आहे.

२. सदरचा खर्च मागणी क्र-बी-१, प्रधानशीर्ष "२०१४-न्यायदान ११४- विधी सल्लागार व समुपदेशी - (००) (०१) संचालक सरकारी अभियोग - २०१४००२९१३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९०/२०१८/विनियम, दिनांक २३.०२.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२२१४५७०९७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2018.03.22 14:59:54 +05'30'

(किशोर शा. भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, अभियोग संचालनालय, खेतान भवन, सदनिका क्र.८, ५ वा मजला, जे. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२१.
२. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र , मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
५. अवर सचिव (विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अवर सचिव (अर्थसंकल्प - १), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती/पोल-१०.